**L. C. BILL No. XXI OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PRIVATE SKILLS UNIVERSITIES (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2024.

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २१.**

**महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक १० जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०२४ चा महा. ३५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

एचबी ०९५७–१

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या अनुसूचीची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यास जोडलेल्या अनुसूचीमध्ये, भाग दोन मधील तक्त्यामध्ये, नोंद ३ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईलः- २०२४ चा महा. ३५.

| | |
|---|---|
| "४. भुजबळ स्किल टेक विद्यापिठ, नाशिक, भुजबळ नॉलेज सिटी, गट क्र. १०७१/२, आडनाव, नाशिक ४२२ ००३ | मुंबई एज्युकेशनल ट्रस्ट, नोंदणी क्रमांक इ-१२४९४ (मुंबई), यांचे मुंबई एज्युकेशनल ट्रस्ट, जनरल ए. के. वैद्य चौक, बांद्रा रेक्लमेशन, बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०० ०५० येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम (१९५० चा २९), अंतर्गत नोंदणीकृत संस्था.". |

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ (२०२४ चा महा. ३५) यामध्ये, महाराष्ट्र राज्यातील कौशल्य शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठाची स्थापना, विधि संस्थापन व विनियमन करण्याची तरतूद केली आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम ६ मध्ये अशी तरतूद केली आहे की, शासन, कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, प्रायोजक मंडळाने, कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केले आहे याबाबत खात्री पटली असेल तर, राज्य विधानमंडळाद्वारे कायदा अधिनियमित करून अनुसूचीमध्ये केलेल्या सुधारणेद्वारे अनुसूचीच्या भाग दोन मध्ये, खाजगी कौशल्य विद्यापीठाचे व त्याच्या प्रायोजक मंडळाचे नाव, ठिकाण व मुख्यालय समाविष्ट करून, त्याद्वारे खाजगी कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी देऊ शकेल.

**३.** कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, शासनाची अशी खात्री पटली आहे की, "भुजबळ स्किल टेक विद्यापीठ, नाशिक" या नावाने खाजगी कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मुंबई एज्युकेशनल ट्रस्ट या प्रायोजक मंडळाने कलम ५ च्या तरतुदींचे अनुपालन केले आहे.

**४.** म्हणून, कायदा अधिनियमित करून त्याद्वारे, प्रस्तावित केलेल्या उक्त खाजगी विद्यापीठाची स्थापना करण्यास परवानगी देण्यासाठी आणि त्यामध्ये, उक्त विद्यापीठ आणि त्याचे प्रायोजक मंडळ याचे नाव, ठिकाण व मुख्यालय समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यास जोडलेल्या अनुसूचीच्या भाग दोन मध्ये सुधारणा करणे इष्ट आहे, असे वाटते.

**५.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ९ जुलै, २०२६.

**मंगलप्रभात लोढा,**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री.

(शा.म.मु.) एचबी ९५७–२ (४००–७-२०२६)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २१. ]**

**[ महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. मंगलप्रभात लोढा,**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री.**]**

**[विधानपरिषदेने दिनांक १० जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव ( ३ ),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.